वाचले

1) दिनांक 26/06/2023 रोजीचा मान्य प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
प्राथमिक शिक्षण विभाग
जा.क्र. शिक्षण/आस्था/1अ/कावि/518/2023
दिनांक 26/06/2023

विषय:- प्रभारी पर्यवेक्षक पदाचा तात्पुरता पदभार देणेबाबत

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिके अतर्गत प्राथमिक शिक्षण विभाग कार्यरत आहे. प्राथमिक शिक्षण विभागातंर्गत मनपाचे प्राथमिक व खाजगी शाळा येतात. शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाचे सोईचे दृष्टीने प्राथमिक शिक्षण विभागातील कार्यरत पदवीधर/अपदवीधर शिक्षक कर्मचाऱ्याचे सेवाजेष्ठतेनुसार पात्र असलेले शिक्षक कर्मचाऱ्यांने मुळपदाचे कामकाज सांभाळुन अतिरिक्त पदभाराचे कामकाज करणेस मा.आयुक्त सो.यांनी पुढील आदेश होईपर्यंत मान्यता देण्यात आलेली आहे.

सबब मी, अतिरिक्त आयुक्त (1) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, या आदेशान्वये उपरोक्त् वाचले 1 नुसार पुढील आदेश होईपर्यंत खालील नमूद केलेले अटी व शर्ती नुसार प्रभारी पर्यवेक्षक पदाचा पदभार तात्पुरत्या स्वरुपात देणेस मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | माध्यम | संगणक क्रमांक | कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | शाळेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी | 11716 | मगर सुनंदा गोरखनाथ | मुख्याध्यापक (पदवीधर) | छ. शिवाजी महाराज मुले प्राथ. शाळा क्र. 4 |
| 2 | उर्दु | 12026 | मोमीन हमीदा अब्दूल करीम | मुख्याध्यापक (पदवीधर) | खराळवाडी उर्दू प्राथ. शाळा, खराळवाडी |

अटी व शर्ती

1) विभाप्रमुख यांच्या सामान्य आणि विशिष्ट निर्देशानुसार व पर्यवेक्षक पदासाठी निर्धारित केलेली कर्तव्येपार पाडण्यास (अटी व शर्ती) बंधनकारक असेल.
2) पर्यवेक्षक अभिनामाच्या पदाचा प्रभारी पदभार सोपविल्यामुळे संबंधितास महापालिकेच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेत,मानीव दिनांकाबाबतचे,सेवाजेष्ठते विषयक व इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल व भविष्यात त्याप्रमाणे मागणी करता येणार नाही.

3) प्राथमिक शिक्षण विभागाच्या आस्थापनेवरील पर्यवेक्षक पदांवर पदोन्नतीने नियुक्ती देणेची कार्यवाहीची पुर्तता पुर्ण होईपर्यंत किंवा अतिरिक्त पदभाराबाबत पुढील आदेश होईपर्यंत या दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत अतिरिक्त पदभार राहिल. तद्नंतर सोपविण्यात आलेला अतिरिक्त पदभाराचा कार्यकाल आपोआप संपुष्टात येईल. याबाबत मा.न्यायालयात कोणताही दावा अथवा कायदेशीर हक्क राहणार नाही.

4) प्रभारी पर्यवेक्षक कामकाजाचा कोणत्याही स्वरुपात आर्थिक लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

5) मुख्यकार्यालयामध्ये थंब इंप्रेशन तसेच हजेरी पत्रकावर स्वाक्षरी त्याच प्रमाणे वरिष्ठांचे सूचनेनुसार फिरतीचे कामकाज करावयाचे झाल्यास फिरती नोंदवही नोंद करणे बंधनकारक राहिल.

(प्रदीप जांभळे पाटील)
अतिरिक्त आयुक्त(1)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -18

प्रति,

1) श्रीम. शिंदे सुनिता फुलवरा,मुख्याध्यापक
2) श्रीम. मोमीन हमीदा अब्दूल करीम, मुख्याध्यापक

प्रत,

सबंधित मुख्याध्यापक-----------------------------------